Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

*The official bulletin of Rotary Club of Pune South*

*Year : 51, Vol : 11, MAY 2021*

**DIVERSITY**
**IS NOT ABOUT**
**HOW WE DIFFER.**
**DIVERSITY**
**IS ABOUT EMBRACING**
**ONE ANOTHER'S**
**UNIQUENESS.**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## *A gift worth $15.5 million will fund the new Rotary Peace Center in the Middle East or North Africa*



Otto and Fran Walter Foundation has pledged $15.5 million to The Rotary Foundation to start a Rotary Peace Center in the Middle East or North Africa.

The new center will offer a professional development certificate program focused on peacebuilding and development issues in the region. This generous gift from the Walter Foundation, which is based in Boothbay Harbor, Maine, USA, will fund the center's startup costs and operating expenses, as well as an endowment that will provide peace fellowships in perpetuity for up to 40 students to study there each year.

"Rotary has, for a long time, looked at how we can make a tangible contribution to the one area of the world where the element of peace has seemed so elusive," says Rotary Foundation Trustee Chair K.R. Ravindran. "Now that opportunity has come our way, thanks to the immense generosity of the Otto and Fran Walter Foundation. We will take full advantage to create a center where we can inspire our peace fellows to give flight to their spirit and equip them to be able to support action that will bring about peace and goodwill in a troubled region."

The Rotary Foundation will select a partner institution to host the Otto and Fran Walter Rotary Peace Center in 2024, and the first Rotary Peace Fellows are

expected to start studying there in January 2026.

The Rotary Peace Centers have trained more than 1,400 fellows who now work in more than 115 countries.

[Read more about Otto Walter and his accomplishments.]




## Rotary Opens Opportunities

Please join us for 2021 Virtual Convention: Rotary Opens Opportunities, 12-16 June. Registration opens in mid-April.

- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

रोटरी

## रश्मी उवाच

रो. डीजी रश्मी कुलकर्णी



२० एप्रिल २०२१

ऐकण्यासाठी क्लीक करा...

२७ एप्रिल २०२१

ऐकण्यासाठी क्लीक करा...


- आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
- डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
- या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
- डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

डिस्ट्रिक्ट कनेक्ट

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## तारें जमीन पर...

दिनांक – ५ एप्रिल २०२१




पाच एप्रिलला संपन्न झालेल्या साप्ताहिक सभेत 'तारें जमीन पर' या लहान मुलांच्या कलागुणदर्शनाचा विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. इतक्या लहान वयातही वेगवेगळ्या गोष्टींची माहिती, त्यांची आवड आणि त्यांतली जाण बघून खरोखरंच थक्क व्हायला झालं. रो. मृदुला घोडके कार्यक्रमाच्या निवेदक होत्या.

'गायिले गणपती' ही गणेश वंदना कथ्थक नृत्यातून सादर करत नंदिता आणि अवंती प्रभूमिराशी यांनी कार्यक्रमाची अतिशय देखणी सुरुवात केली. रो.रमेश आणि ॲन चित्रा प्रभूमिराशी यांच्या या नाती आहेत. रो. रश्मी परुळकर यांचा मुलगा छोटा शेफ शर्व परुळकर यानं चॉकलेट पॅनकेक तयार करून दाखवला. पदार्थ दिसायलाही इतका छान होता की बघूनच प्रेक्षकांच्या तोंडाला पाणी सुटलं. शर्व परुळकर इयत्ता पाचवीत असून स्पोर्ट्समध्ये प्रवीण आहे.

रो.निरंजन आणि ॲन रुपाली ठाणगावकर यांचा मुलगा आरव ठाणगावकर पाचव्या इयत्तेत शिकतो. यानं गिटारवर 'ये दोस्ती' (शोले) हे गाणं सादर केलं. तसंच त्यांच्या मुलीनं, सारानं 'ओ साकी साकी' गाण्यावर नृत्य सादरीकरण केलं. ही छोटीशी डान्सर सीनिअर केजीमध्ये शिकते.





रो.आनंद आणि ॲन कांचन बदामीकर यांची नऊ वर्षांची मुलगी अवनी बदामीकर हिनं ‘पिंगा ग पोरी’ या गाण्यावर नृत्य सादर केलं. चित्र काढणं, सायकलींग, पदार्थ बनवणं, डान्स यांची तिला आवड आहे.

कवी सोहनलाल द्विवेदी यांची ‘कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती’ ही कविता मल्हार प्रभुणे यानं सादर केली. मल्हार इयत्ता पाचवीत असून रो.रवींद्र आणि ॲन सुनीता प्रभुणे यांचा नातू आहे. त्याला खेळाची विशेष आवड असून बॅडमिंटन स्पर्धेत तो भाग घेतो. रो.शाम आणि ॲन विनीता कुलकर्णी यांचा दुसरीत शिकणारा आठ वर्षांचा नातू अबीर कुलकर्णी यानं ‘हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे’ ही प्रार्थना अतिशय मनापासून सादर केली. सात वर्षांच्या दुसरीत शिकणाऱ्या रिया नातू हिनं ‘पापा कहते है बडा नाम करेगा’ हे गाणं पियानोवर सादर केलं. आर्या नातूनं जिमनॅस्टिक या खेळाचे प्रकार करुन दाखवले, सोफिया नातूनं पियानो वादन केलं तसंच दोघींनी मिळून संस्कृत श्लोकपठण केलं. रिया नातू, आर्या नातू आणि सोफिया नातू या तिघी रो.योगेंद्र आणि ॲन मोहिनी नातू यांच्या नाती



आहेत. आर्या आणि सोफिया अमेरिकेत राहतात. रो.अभिजित आणि ॲन माधवी देशपांडे यांची चौथीत शिकणारी मुक्ता देशपांडे हिनं स्वतः लिहिलेली उन्हाळ्याची विनोदी कविता सादर केली. ती गोष्टी लिहिते, कविता करते तसंच गाणंही शिकते. कार्यक्रमात पुढे शर्वरी देवधर हिनं 'केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर' हे गाणं सादर केलं. रो. दत्ताजी आणि ॲन अंजली यांची नात तसंच केदार आणि प्रज्ञा यांची ती मुलगी आहे. ती गाणं शिकते. २०१८साली दुबई इथे झालेल्या गाण्याच्या स्पर्धेत तिला सुवर्णपदक मिळालं आहे. तिचा भाऊ शार्दूल देवधर यानं ससे, कोंबड्या,





शेळ्या, गायी, कुत्री इ. शेतावरचे प्राणी-पक्षी दाखवले तसंच त्याच्या या मित्रांची त्यानं ओळख करून दिली. त्याला गणित आणि चित्रकलेची आवड आहे.

सायशा चुटके हिनं 'छबिदार छबी' या गाण्यावर फ्युजन प्रकारचं नृत्य सादर केलं. तिसरीत शिकणारी सायशा रो.दत्तात्रेय आणि ॲन अंजली पाशाणकर यांची नात आहे. डान्सिंग, अक्टिंग, आर्चरी आणि पेंटिंग हे तिचे छंद आहेत. छोट्याशा रवीश आपटेनं अंकांची माहिती सांगणारी एक जर्मन कविता सादर केली. रो.विलास आणि ॲन अस्मिता यांचा तो नातू आहे. नववीत शिकणाऱ्या रिद्धी कुलकर्णीनी 'वऱ्हाड निघालं लंडनला'चा छोटा भाग सादर केला. रो.संदीप कुलकर्णी यांच्या

रिद्धीला अभिनयाची आणि नृत्याची आवड असून आंतरशालेय नाट्य स्पर्धेत ती भाग घेते. चौथीत शिकणाऱ्या आरव आठल्येनं गिटारवर ‘अजीब दासता है ये’ आणि एक स्पॅनिश धून सादर केली. रो.मृदुला घोडके यांचा तो नातू असून केदार आणि अनुश्री आठल्ये यांचा तो मुलगा आहे. त्याला रंगमंच तसंच गाण्याची आवड आहे.

रो.विनोदभाई आणि ॲन सरिता यांचा नातू अद्विक अगरवालला नाच करणं, गाणं म्हणणं तसंच पझल मेकिंगची आवड असून तो केजीमध्ये शिकतो. त्यानं छानसं नृत्य सादर केलं. मिहिर लिमये यानं बैल पोळा या सणाचं एक छान गाणं सादर केलं. मिहिर रो.सुधांशू गोरे यांचा नातू असून गणित आणि विज्ञान हे त्याच्या आवडीचे विषय आहेत तसंच त्याला पेटी वाजवायलाही आवडतं. मार्शल आर्ट्स रिजनल स्पर्धेत त्यानं कांस्य पदक पटकावलं असून तो वॉशिंग्टनमध्ये राहतो.

नविशा हिनं पंजाबी गाण्यावर नृत्य सादर केलं. रो.विनोदभाई आणि ॲन सरिताभाभी यांची ही नात आहे. तिला गाण्याची आवड आहे तसंच तिला बॅडमिंटन या खेळात प्राविण्य आहे. तिचा पाच वर्षांचा भाऊ क्रिशव अगरवाल यानं ‘बन्सीवाले हमारे घर आ जाना’ या गाण्यावर नृत्य सादर केलं. त्याला आर्ट आणि क्राफ्ट तसंच लेगो ब्लॉक्स आवडतात. रो.योगेश आणि ॲन ऋचा नांदुरकर यांचा मुलगा सिद्धराज नांदुरकर यानं पत्त्यांची जादू करून दाखवली. तो जादूगार जितेंद्र रघुवीर यांच्याकडे जादू शिकतो. सिद्धराज आंतरशालेय पातळीवर प्रथम श्रेणीचा टेबल टेनिस खेळाडू आहे तसंच तो क्रिकेटच्या इंटरक्लब स्पर्धांमध्येही खेळतो. प्रीशा, श्रीया, शर्विल पटवर्धन ही रो.गोविंदराव आणि ॲन चारुशिला यांची नातवंडं आहेत. प्रीशा आणि श्रीया या दोघींची आई आरती आकाशवाणीमध्ये अनाऊन्सर आहे. प्रीशानं निवेदन केलं तसंच इंग्लीश गाणं सादर केलं तर शर्विलनं इंग्लीश कविता सादर केली. श्रियानं जेरुसालिमा या आफ्रिकन गाण्यावर नृत्य सादर केलं.

रो.आनंद आणि ॲन अपर्णा कुलकर्णी यांच्या चौथीत शिकणाऱ्या साहिलनं ‘हो जाओ तय्यार साथियो’ हे गाणं सादर केलं. अद्वैत बडवे यानं ‘व्हेजी फ्राईज’ या पदार्थाची कृती दाखवली. त्याची आई आहारतज्ज्ञ आहे. अद्वैत हा रो.विलास आणि ॲन अस्मिता आपटे यांचा नातू असून तो सहावीत शिकत आहे.

ज्युनिअर केजीमध्ये शिकणाऱ्या पाच वर्षांच्या रिया द्रविडनं ‘तू बुद्धी दे तू तेज दे’ हे गाणं सादर केलं. डॉ.राजेंद्र आणि ॲन अनुश्री गोसावी यांची ती नात आहे. चार वर्षांच्या रेयांश जायदे या छोट्या कलाकारानं बडबड गोष्ट तसंच बडबड गीत सादर केलं. रेयांश जायदे रो.शाम आणि ॲन विनीता कुलकर्णी यांचा नातू आहे. अस्मी प्रभुणे या छोट्या गोड मुलीनं तिच्या बाबांनी शिकवलेली निसर्ग कविता सादर केली. अस्मी रो.रवींद्र प्रभुणे आणि ॲन सुनीता प्रभुणे यांची नात आहे. न्यूजर्सीहून रो. किरण आणि ॲन स्वाती वेलणकर यांचा सहा वर्षांचा नातू शौनकनं सौरमालेबद्दल खूप छान माहिती दिली. त्याला ॲस्ट्रोनॉट् व्हायचं आहे. कार्यक्रमात शेवटी रो.अभिजीत आणि ॲन माधवी देशपांडे यांचा दहावीत शिकणारा आदित्य यानं सतार वादन केलं. त्यानं मध्य लयीत, तीन तालात यमन रागाची ओळख करून दिली.

फर्स्ट लेडी सुगंधा नातूंच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम साकार झाला. हा कार्यक्रम करण्यामागचा दृष्टीकोन सांगून हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल त्यांनी सर्व बालकलाकारांचे, त्यांच्या पालकांचे आभार मानले आणि हा कार्यक्रम संपन्न झाला.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## 'तहान परिवर्तनाची'
## – आंबेजोगाई परिसरातील जलसंधारण

**व्याख्याता – श्री. प्रसाद चिक्षे**

दिनांक – १२ एप्रिल २०२१





'नेमेची' येणाऱ्या दुष्काळाशी दोन हात करणाऱ्या युवकांना आणि गावकऱ्यांना या लढ्यासाठी प्रेरणा देणाऱ्या एका उच्चशिक्षित युवकाची ही कामगिरी...! आंबेजोगाई हा दुष्काळी परिसर आहे. इथं पाण्याचं कायमच दुर्भिक्ष... अशा ठिकाणी जाऊन लोकांना एकत्र करून त्यांना जलसंधारणाचं महत्त्व आणि टेक्निक्स शिकवून त्यांच्या जीवनात बदल घडवून आणलेल्या वल्लीची कथा त्यांच्याच तोंडून बारा एप्रिलच्या साप्ताहिक सभेत ऐकायला मिळाली. या कार्यक्रमाच्या समन्वयक ॲन विशाखा वेलणकर होत्या. श्री. प्रसाद चिक्षे इंजिनिअर आहेत. ज्ञानप्रबोधिनीच्या आंबेजोगाई विस्तारकेंद्राचे ते केंद्रप्रमुख आहेत. त्यांची वाटचाल त्यांनी या कार्यक्रमात उलगडली. खूप मेहनतीनं या जलसंधारणाचं अभ्यासपूर्ण सकारात्मक काम त्यांनी आंबेजोगाईमध्ये केलं आहे. या परिसरातल्या शंभरपेक्षा जास्त गावांना त्यांच्या या अमुल्य मार्गदर्शनाचा फायदा झालेला आहे. तळागाळात जाऊन अतिशय तळमळीनं, निस्वार्थ भावनेनं, स्वतःला झोकून देऊन समाज परिवर्तनाचं काम करणाऱ्या या अवलियाची ही कहाणी सगळ्यांनाच भावली.

## श्रद्धांजली विशेष सभा

दिनांक – १९ एप्रिल २०२१

सतरा एप्रिलला रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ उर्फ विसुभाऊ (दादा) गोडबोले यांचं दुःखद निधन झालं. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एकोणीस एप्रिलला झूमद्वारे श्रद्धांजली विशेष सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. सगळ्या सदस्यांनी विसुभाऊंच्या आठवणी जाग्या केल्या. नेहमी उत्स्फुर्तपणे क्लबच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेणाऱ्या, हसतमुख अशा विसुभाऊंचा सहवास या पुढे क्लबच्या सदस्यांना लाभणार नाही याबद्दल सगळ्या सदस्यांनी दुःख व्यक्त केलं. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो अशी सगळ्यांनी प्रार्थना केली आणि ही श्रद्धांजली विशेष सभा समाप्त झाली.

# सद्भावना मेडिकल कॅम्प
# – जम्मू आणि काश्मीर

दिनांक – २६ एप्रिल २०२१




रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ, आरआयडी ३१३१ मेडिकल ॲव्हेन्यू आणि बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशन यांनी १५ एप्रिल २०२१ ते २२ एप्रिल २०२१ या काळात एकत्रितपणे राबवलेल्या 'सद्भावना मेडिकल कॅम्प'चं तपशीलवार वर्णन करणारा माहितीपूर्ण कार्यक्रम २६ एप्रिलच्या साप्ताहिक सभेत सादर झाला.

फेब्रुवारी २०२०मध्ये असा कॅम्प घेण्याबद्दल विचार सुरू झाला आणि आर्मी तसंच संबंधित अधिकाऱ्यांच्या परवानग्या मिळवण्यात आल्या. फिजीशिअन, ऑप्थॉल्मोलॉजीस्ट, गायनॅकोलॉजीस्ट, आय सर्जन, पॅथोलोजीस्ट अशी



डॉक्टर्सची टीम आणि स्वयंसेवक अशा सोळा जणांची टीम १४ एप्रिलला पहाटे विमानानं श्रीनगरला पोहोचली. सकाळी आवरून कुपवाराच्या बीडब्लुएफ(BWF) होमला भेट दिली. तिथून सगळेजण रात्री मुक्कामाच्या ठिकाणी रामपूर उरीला आर्मी कॅम्पमध्ये पोहोचले.

१५ तारखेला सकाळी कमलकोट उरी इथल्या शाळेत कॅम्पला सुरुवात झाली. औषधं आणि जरुरीचं सगळं सामान कुरिअरने आधीच जागेवर पोहोचलं होतं. स्थानिकांचा उत्साह आणि प्रतिसाद बघून टीमचा उत्साहदेखील दुणावला. तिथून जवळच असलेल्या चाकोटी या भारतीय सीमेवरच्या गावाला भेट देण्याची टीमची इच्छा आर्मीच्या मदतीनं पूर्ण झाली. १६ तारखेला नवा गाव उरीला, १७ तारखेला नौगमला, १८ तारखेला बारामुल्ला इथं रोज सकाळी नऊ ते संध्याकाळी चार या वेळात मेडिकल कॅम्प घेण्यात आला. प्रत्येक ठिकाणीच अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. १८



तारखेला बारामुल्ला इथं या मेडिकल कॅम्पची सांगता झाली. १९ तारखेला आर्मी मुख्यालय, बदामी बाग, श्रीनगर आणि डिव्हीजनल कमिशनर श्रीनगर यांनी टीमला भेटीचं निमंत्रण दिलं होतं. टीमच्या काही सदस्यांनी या भेटीचा आनंद घेतला. या चार दिवसांत काही गोष्टी प्रकर्षानं टीमच्या लक्षात आल्या. कोसळणारा पाऊस, रमझानचे उपवास असतानाही स्थानिकांचा मिळालेला उदंड प्रतिसाद, प्रत्येक ठिकाणी हजारांहुन जास्त लोकांची हजेरी, आर्मी जवानांची सक्रीय मदत, स्थानिक प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल, अशा पद्धतीचे कॅम्प्स जास्तीतजास्त घेतले जावेत यासाठी असलेला स्थानिकांचा आग्रह यांमुळे सगळी टीम भारावून गेली.

अधिक कदम हा महाराष्ट्रातला एक उत्साही सामाजिक कार्यकर्ता जो सध्या काश्मीरमध्ये काश्मिरी मुलींच्या शिक्षणासाठी खूप मोलाचं काम करत आहे. त्याच्या बहूमोल मार्गदर्शनामुळं आणि सहकार्यामुळं हा उपक्रम यशस्वी

झाला. १९ आणि २० या दोन दिवसांत सद्भावना मेडिकल कॅम्पच्या टीमनी बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशनच्या चार होम्सना आणि प्रशिक्षण केंद्रांना भेट दिली. १९ तारखेला सद्भावना मेडिकल कॅम्पच्या टीमनी रोजच्या वापरातल्या उपयोगी वस्तूंची तयार केलेली छोटी किट्स तिथल्या मुलींना भेट दिली. तन्मार्ग प्रशिक्षण केंद्र आणि बीरवाह होम या ठिकाणी सद्भावना मेडिकल कॅम्पच्या टीमनी भेट देऊन तिथल्या मुलींशी संवाद साधला. २० तारखेला श्रीनगर होम आणि अनंतनाग होम या दोन ठिकाणी टीमनी भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणी मुली मनमोकळं बोलत असल्याचं टीमच्या लक्षात आलं आणि आपल्या मदतीची तिथं किती आवश्यकता आहे हे अधोरेखीत होत राहिलं... कॅम्पच्या शेवटच्या दिवशी सगळ्या टीमनी जगप्रसिद्ध ट्युलिप गार्डनमध्ये फिरण्याचा आनंद घेतला. प्रवासात जितकं बघता आलं तितकं काश्मीर बघितलं, सृष्टीसौंदर्य अनुभवलं आणि थोडी फोटोग्राफीही केली, एके४७ ही रायफल हातांत धरून बघितली, काश्मीर रोटरी क्लबच्या एका रोटेरिअन हॉटेल व्यवसायिकला भेटण्याचा आणि त्यांच्याकडे जेवण्याचा असा दुहेरी आनंद घेतला. नवीन मित्रमैत्रिणी, खूपसारा अनुभव आणि एक वेगळा आनंद बरोबर घेऊन २२ तारखेला सद्भावना मेडिकल कॅम्पची टीम विमानानं पुण्यात परतली.

सद्भावना मेडिकल कॅम्पमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभागी झालेली आणि वयानं सगळ्यांत लहान असलेली ॲनेट मैत्रेयी पूर्णपात्रे हिनं आपले अनुभव सगळ्यांना सांगितले. इंडिअन आर्मीवरचा आणि टीममधल्या सगळ्या सदस्यांवर असलेला गाढ विश्वास तिच्या बोलण्यातून दिसत होता. अशा प्रकारच्या कॅम्प्सना येण्याचं आवाहन तिनं तिच्या वयाच्या सगळ्या मुलांना केलं. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे सगळे सदस्य, सद्भावना मेडिकल कॅम्पचे सगळे सदस्य, आरआयडी ३१३१ मेडिकल व्हेन्यू आणि बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशन या सगळ्यांचे नेट मैत्रेयी पूर्णपात्रे हिनं आभार मानले आणि हा संस्मरणीय कार्यक्रम संपन्न झाला.

- **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा**

## साप्ताहिक सभा

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**

क्लबकारी

## Sadbhavana Medical Check-up Camp, Uri



Rotary Pune South & RI District 3131 Medical avenue, in association with Borderless World Foundation (of Shri Adhik Kadam) and Indian Army Unit 19 had organised a Sadbhavana Medical Check up camp at Uri, Dist. Baramulla, J&K on 15th April to 18th April. A Team of 9 multidisciplinary Doctors and six volunteers had participated in this. More on this in the next issue of the bulletin.

**Media coverage of Sadbhavana Medical Camp**

https://www.facebook.com/gbn24Jk/videos/568911344023052/?app=fbl

https://www.facebook.com/gbn24Jk/videos/495438208145810/?app=fbl

https://jktribune.com/rotary-club-of-pune-and-borderless-world-foundation-organise-super-speciality-medical-camp-at-army-goodwill-school-naugam/

https://www.kupwaratimes.org/rc-pune-bwf-organise-super-speciality-medical-camp-at-army-goodwill-school-naugam/


- अध्यक्ष सुदर्शन संवाद
- विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद
- क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स
- जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद / यामिनी

क्लबकारी

कलाकारी

# माझ्या आठवणीतले पुणे – सेनादत्त पेठ

**रो.विनायक जोशी**

१२ जुलै १९६१ या दिवशी पानशेत धरण फुटलं. बरंच पुणं वाहून गेलं पण म्हणूनच पेठांमध्ये बंदिस्त झालेलं पुणं बदललं आणि पसरलं सुद्धा... आम्ही भाड्यानं राहात असलेला नारायण पेठेतला मोदी गणपती मंदिराजवळचा वाडा पुरात वाहून गेला त्यामुळं पुढे काही दिवस आमची व्यवस्था कॅम्पमधल्या सदर्न कमांडजवळच्या बरॅकमध्ये झाली. त्यावेळी बर्वे नावाचे कार्यक्षम कमिशनर पुण्याला लाभले होते. त्यांनी सैन्याच्या मदतीनं शास्त्री रोडवरच्या लोकमान्य नगर समोरच्या जागेत शंभर पत्र्याच्या झोपड्या काही महिन्यांत बांधून घेतल्या. त्यांचं नाव ‘निसेन हट’... या हटमध्ये पत्र्याचंच पार्टीशन टाकून एका भागात एक कुटुंब अशा तऱ्हेनं दोनशे कुटुंबांची राहण्याची सोय झाली होती.

संपूर्ण पत्र्याची झोपडी. बाजूला जाळीचे बंद न होणारे झरोके. तिथं अशा परिस्थितीत चौदा वर्षं काढली हेसुद्धा आता अविश्वसनीय वाटतं. या वसाहतीला ‘सेनादत्त पेठ’ असं नाव दिलं गेलं. संस्कृत शब्द सेनादत्त म्हणजे सेनेनं (बांधून) दिलेलं... दत्त या देवाचा इथं काहीही संबंध नाही. मात्र निसेन हटमधलं वास्तव्य आयुष्यात कणखर होण्याच्या दृष्टीनं खूप उपयोगी पडलं. पत्र्याच्या घरामुळं त्या काळातली अती थंडी, घाम काढणारा उन्हाळा आणि पत्र्यावर आवाज करणारा पावसाळा या सगळ्यांची शरीराला सवय झाली. उंदीर भरपूर असायचे त्यांना खायला येणारे सापही वरचेवर निघायचे.

सध्याच्या सेनादत्त पोलीस चौकीमागं आम्ही राहायचो. सगळे पोलीस आमचे मित्र होते ते आमच्याबरोबर क्रिकेटही खेळायचे. पुढे शहरात राहायला गेलो तरी सेनादत्त पेठेत येऊन आम्ही सूरपारंब्या खेळत असू. साधारण १९७०पर्यंत शास्त्री रोड आत्ताच्या निम्मासुद्धा रुंद नव्हता. पर्वतीवर एकही झोपडी नव्हती. सुट्ट्यांमध्ये सकाळी आम्ही शाळेतली मुलं सध्याच्या जनता वसाहतीतल्या कॅनॉलवरचा छोटा पूल ओलांडून डोंगरावरून पर्वतीवर जाऊन येत असू. विठ्ठलवाडी हे गावाबाहेरचं सहलीचं ठिकाण समजलं जायचं. सध्याच्या सिंहगड रोडच्या दोन्ही बाजूंना वडा–पिंपळाची मोठी झाडं होती. सध्याच्या महावितरण ऑफीसशेजारी सह्याद्री डाय स्टफ हा रंगाचा कारखाना होता आणि उसाची शेती होती. लोकमान्य नगर बससेवासुद्धा साधारण १९६८ला सुरू झाली. विश्रामबाग वाड्यापर्यंत बस नंबर दोन जायची. कित्येक वर्षं पूना हॉस्पिटल चौकात एक बांधकाम कोर्टाचा स्टे घेऊन उभं होतं तिथून अलका टॉकिज चौकापर्यंत मासळी बाजार भरायचा. अलका टॉकिजला नेहमी इंग्लीश सिनेमे लागायचे. जुन्या लोकांनी ‘Great Escape’, ‘Bridge on the river Kwai’ असे सिनेमे तिथेच पाहिले आहेत. अलका टॉकिज चौकातला राधेचा खूप सुंदर पुतळा सगळ्यांचा लक्ष वेधून घ्यायचा. रस्ता रुंदीकरणामध्ये तो पुतळा हलवला तेव्हा सगळेजण हळहळले होते.

आता सेनादत्त पेठेजवळून जाताना जुना शांत रस्ता आठवतो. सेनादत्त चौकीबाहेर पोलिसांबरोबर खेळलेले क्षण आठवतात. एक निसेन हट अजूनही चौकीजवळ उभी आहे. तिच्याकडे लक्ष गेल्यावर नकळत मनात येतं ‘जाने कहाँ गयें वो दिन...’

# माझ्या आठवणीतले पुणे

रो. श्वेता करंदीकर

जन्मापासूनच 'पुण्यनगरीतील पुण्यवान नागरिक' असल्यामुळं या महिन्यातल्या बुलेटिनमध्ये 'आठवणीतील पुणे' असा विषय दिल्यामुळं लिहावंसं तर वाटत होतं... पण माझ्या आठवणीतलं पुणं काही खूप जुनं नाही. मी लिहिणार आहे १९७५ ते १९९५च्या काळाविषयी. ते माझे शाळा कॉलेजचे दिवस होते. आमचे शिवाजीनगरला मोठं घर होतं. भांबुरड्यातल्या रोकडोबा मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त जत्रा भरत असे. माझ्या आजोबांचा वाढदिवस पण हनुमान जयंतीचा... त्यामुळे सगळेजण एकत्र जमायचे. आमचा मोठा गोतावळा होता. संध्याकाळी मस्त जत्रेला जायचं. गोड शेव, गाठी खायची आणि पिपाणी वाजवत घरी यायचं. सिझनचं पहिलं आंबा आईस्क्रीम त्या दिवशी खाल्लं जायचं. शनिवार पेठेतल्या 'देवयानी'कडे चार दिवस आधीच ऑर्डर दिलेली असायची. 'शास्त्र'च असायचं ते...

आमचा देशपांड्यांचा 'गणपतीचा कारखाना' प्रसिद्ध होता त्यामुळे गणपती उत्सव ही एक पर्वणी असायची. घरी जवळजवळ दिडशे शाडूच्या मूर्ती तयार केल्या जायच्या. एक पर्वणीच असायची ती... घरचा गणपती साधाच. देखाव्याचा अट्टाहास नव्हता पण खानदानी उत्सव नक्की होता. जेवणाला प्रासादिक चव होती. पाचव्या दिवशी गणपती विसर्जन करताना अनोळखी लोकांना आंबेडाळ देताना कधीही लाज वाटत नव्हती. मग कॉलेजविश्व सुरू झालं. शिवाजीनगरचं मॉडर्न कॉलेज हे माझे कॉलेज... तिथल्या ममतामध्ये मिळणारी कचोरी आणि सामोसा जगात भारी वाटायचा. तेव्हा एफसी रोडवर एकेरी वाहतूक नव्हती. डेक्कनवरच्या हाँगकाँग लेनमध्ये जाऊन एकदम मॉडर्न वस्तू खरेदी करताना मजा यायची.

अजून एक आठवण म्हणजे गुढीपाडवा ते रामनवमी या काळात चालणाऱ्या दगडूशेठ हलवाई गणपतीच्या संगीत महोत्सवाची. महोत्सव काळात संध्याकाळी बेलबाग चौकातली वाहतूक बंद केली जायची आणि सतरंज्या अंथरल्या जायच्या. कार्यक्रम जरी रस्त्यावर सादर होत असला तरी त्याचा दर्जा राखला जायचा. आम्हा तरुणांना ती पर्वणीच असायची. अनेक उत्तमोत्तम कलाकारांचं गाणं तिथं ऐकता आलं.

बघताबघता आता मी पण 'आमच्या काळी असं होतं, असं नव्हतं' असा सूर लावायला लागलीय का? 'चेंज इज द ओन्ली कॉन्स्टंट – ॲक्सेप्ट इट' आपलं वय वाढलंय आणि आपण प्रौढ झालो आहोत हे मात्र जाणवायला लागलंय.

ता. क.- वर उल्लेख केलेली दोन्ही दुकानं, देवयानी आणि ममता अजूनही सुरू आहेत. पण माझ्या लहानपणी खाल्लेल्या तिथल्या पदार्थांना आता तशीच चव आहे का हे मला मात्र माहीत नाही.

# माझ्या आठवणीतले पुणे

## रो. विलास आपटे

ऐकण्यासाठी क्लीक करा...

'माझ्या आठवणीतले पुणे' म्हणल्यावर एक सुंदर, रम्य आणि शांत चित्र डोळ्यांसमोर येतं. त्याच्या काही खुणा अजूनही दिसतात त्या खुणा, त्या आठवणी मला जमतील तशा मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे.

माझे आजोबा श्री. त्रिंबक रामचंद्र आपटे यांनी १९२१साली 'आपटे मोटर स्कूल' ही संस्था सुरू केली. माझे वडील श्री. वासुदेव त्रिंबक आपटे यांनी १९५०-५१च्या सुमारास 'आपटे मोटर स्कूल'ही संस्था अलका टॉकीजसमोरच्या जागेत स्थलांतरीत केली आणि शेजारीच आम्ही राहत होतो त्यामुळे मी जन्मापासूनच टिळक रोडला राहतो आहे. त्या काळात अलका टॉकीज हे फक्त इंग्लीश सिनेमांसाठी प्रसिद्ध होतं तरीसुद्धा तिथं फक्त दादा कोंडके यांचेच मराठी सिनेमे लागत असत.

सध्या झेड ब्रिजेवळ जी गवळण बसवलेली आहे ती त्या काळात लकडी पूल चौकात होती आणि तिथली पोलीस चौकी ही सध्या सेनापती बापट यांचा पुतळा आहे त्या जागेवर होती.

जंगली महाराज रोडनी पुढे आल्यावर पूर्वीचं हिंद विजय हे थिएटर होतं ज्याचं नाव बदलून नटराज टॉकीज झालं आणि आता तेही अस्तित्वात नाही

मला आठवतंय तेव्हापासून जंगली महाराज रोड ते स्वारगेट आणि पुढे सातारा रोड कात्रज हा नॅशनल हायवे चार होता. टिळक रस्त्यावरून सहजपणं ट्रक्स, गाड्या, सायकली यांची वाहतूक सुरू असे आणि माणसं चालत जाऊन फिरू शकत होती आता मात्र तिथंच दर मिनिटाला ट्रॅफिक, गर्दी दिसते. त्यावेळेस इंजिनिअरिंग कॉलेजपासून पुढे येण्यासाठी रेल्वे क्रॉसींग क्रॉस करण्यासाठी मॅन्युअल बेरी गेट होतं. साधारण १९६१-६२पर्यंत शास्त्री रोड, लोकमान्य नगर आणि निसेन हट हे काही नव्हतं. पुरानंतर हे सर्व डेव्हलप झालं. सध्या जिथं पुना हॉस्पिटल आहे तिथं स्मशानभूमी होती. सारसबाग, पेशवे पार्क आणि पर्वती इथं जाण्यासाठी एसपी कॉलेजच्या शेजारून रस्ता होता. त्यावेळेस सारसबाग हे नाव नसून तळ्यातला गणपती म्हणायचे. तळ्यातल्या गणपतीची आठवण म्हणजे आत्ताच्या पेशवे पार्कमधून थोडंस खाली उतरून तळं ओलांडायला मातीचा भराव टाकून एक बंधारा बांधलेला होता. परत थोड्या पायऱ्या चढून देऊळ, छोटा गाभारा, गाभाऱ्यात सुंदर मूर्ती आणि त्या समोर पत्र्याचा सभामंडप. पुरानंतर तळं बुजावण्यात आलं, सभामंडप संगमरवरी झाला, रस्ता मोठा झाला, आजुबाजूला दुकानं वाढली पण मंदिरात गेल्यावर वाटणारी प्रसन्नता अजूनसुद्धा तशीच आहे

विठ्ठलवाडीला जाण्यासाठी स्वारगेटहूनच जावं लागत असे; त्यावेळेस दांडेकर पूल नव्हता. तसंच रस्ता खूप लहान होता आणि संपूर्ण सिंहगड रोडवर दुतर्फा वडाची झाडं होती. रस्त्यावर गर्द सावली असायची. त्यावेळेस विठ्ठलवाडी हे ट्रीपला जाण्याचं ठिकाण होतं. नदीचं पाणी खूप स्वच्छ असायचं. आम्ही तिथं पोहायला जायचो पण संध्याकाळी सहानंतर एकदम शुकशुकाट असायचा त्यामुळं संध्याकाळी सहाच्या आत घरी यायला लागायचं. तसंच पुढे खडकवासला आणि सिंहगड या ठिकाणी आम्ही सायकलवरून जात असू. तेव्हा एवढी रहदारी नव्हती त्यामुळे आम्हाला घरचे लोक सायकलवरून जाण्याची परवानगी देत असत.

तसेच त्या काळात बाजीराव रोड, कुमठेकर रोड आणि लक्ष्मी रोड या रस्त्यांवर एकेरी वाहतूक नव्हती, इतकी कमी गर्दी त्या वेळेला होती. तसंच लकडी पूलदेखील निम्मा होता. डेक्कन जिमखाना बस स्टॉपपासून खाली नदीपात्रातून केळकर रोडला जोडणारा एक कॉजवे होता. त्या काळात लकडी पूल, नवा पूल, कोर्टापासून पुढे जाणारा पूल आणि बंडगार्डन इथला पूल एवढेच पूल होते बाकीचे सगळे पूल पुरानंतर पंधरा-वीस वर्षांत झालेले आहेत. त्या काळात सातारा रोडवरचं पद्मावतीचं मंदिर हे गावाबाहेर होतं आणि त्यावेळेस ट्रीप म्हणून संपूर्ण दिवस आम्ही तिथं जात असू. माझ्या माहितीप्रमाणे संभाजी पार्क, पेशवे पार्क, कमला नेहरू पार्क, बंडगार्डन आणि त्यांमधील एक बाग तेवढ्याच बागा होत्या. तेव्हा एम्प्रेस गार्डन हे एक गावाबाहेरचं सहलीचं ठिकाण म्हणून ओळखलं जायचं. एम्प्रेस गार्डनसमोर खूप मोठं रेस कोर्स आहे त्या काळात घोडे बघण्यासाठी आम्ही वडलांबरोबर ट्रकमध्ये बसून जात होतो आणि तिथं गेल्यावर ट्रकच्या टपावरून रेस बघायचो.

महात्मा फुले मंडई हा पूर्वी घाऊक बाजार होता. १९६१च्या पुरानंतर मार्केटयार्डचा बाजार सुरू झाला.

आजही पुण्याची असलेली ओळख म्हणजे पुण्याचा सार्वजनिक गणेशोत्सव... छोटे मांडव, त्यात गणेशाची मूर्ती आणि आरास म्हणजे गाण्यावर हलणारे इलेक्ट्रिक दिवे नंतर काही वर्षांनी छोटी पथनाट्यं सुद्धा सादर केली जात. अनंत चतुर्दशीला विसर्जन मिरवणूक मंडईपासून सुरू होऊन डेक्कनच्या चौकात संपायची. बरोबर तीन वाजता मानाच्या गणपतींचं विसर्जन झालेलं असायचं आणि बाकी सर्व मंडळांच्या मिरवणुका रात्री एक वाजता संपायच्या. घरात बसून या सगळ्या मिरवणुका आम्ही बघायचो.

पुण्याला सायकलींचं शहर मानलं जायचं. आता त्या सायकलची जागा मोटारसायकलनी घेतली आणि गाड्यांच्या, मोटारसायकलींच्या भरधाव वेगात पुण्याची ओळख असलेली सायकल मात्र हरवून गेली...

## पुणेरी सायकल

**रो. डॉ. सुभाष देशपांडे**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

मी १९५६साली पुण्यात आलो. त्याअगोदर ठाण्यात राहात होतो. वडिलांची बदली झाल्यानंतर पुण्यात आलो. ठाण्यात असताना पायी चालणे हेच प्रवासाचे मुख्य साधन होते. सायकल ही एक हौसेची गोष्ट असे किंवा ती एक सधनतेचे लक्षण असे.

पुण्यात आल्यावर सायकल हे एक गरजेचे वाहन आहे हे लक्षात आले. ठाण्यात असताना गावाच्या दुसऱ्या टोकापर्यंत झपाझप चालत जात असे पण पुण्यात आल्यावर शंभर फुटांवरील वाण्याच्या दुकानातसुद्धा सायकलीवरून जाणे होत असे.

पुण्यात असताना माझी शाळा सदाशिव पेठेतील गोपाळ हायस्कूल ही होती. पुण्यात येण्यास उशीर झाला म्हणून मला बाकीच्या शाळांत प्रवेश मिळेना. माझे एक चुलते लक्ष्मण देशपांडे मास्तर गोपाळ हायस्कूलचे प्रमुख व संस्थापक असल्यामुळे दोन महिने उशीराने सुद्धा मला त्या शाळेत प्रवेश मिळाला. मी त्यावेळेस विजयानगर कॉलनीत राहात

होतो. खरेतर गोपाळ हायस्कूल घरापासून फार दूर नव्हते. ठाण्यात माझी शाळा साधारणपणे एव्हढीच दूर होती. तिकडे मी चालत जात असे परंतु पुण्यात मात्र शाळेत सायकलीवरून जाणे होत असे.

पुणेरी कडक उन्हाळा मला नवाच होता. कधी पाऊस सुरू होणार असे व्हावयाचे. मे महिन्यातील वळवाच्या सरी कोसळल्यावर किंवा पावसाळ्यात जर कदाचित मुसळधार पाऊस पडला तर सायकलवर स्वार होऊन टिळक रोडवरून तुफान वेगात सगळा सदाशिव पेठ परिसर पालथा करीत ओलेचिंब भिजण्यात जी मजा यावयाची ती अपूर्वच होती.

त्यावेळेस पर्वतीवर जाण्यास सरळ मार्ग नव्हता. कॅनॉलवर एक लोखंडी पूल होता. पेशवे पार्कवरून सिंहगड रोड ओलांडल्यावर एक लोखंडी जिना लागत असे. सायकल हातात घेऊन किंवा खांद्यावर चढवून तो जिना पायी चढून पर्वती गावातून सायकलीवरून जावे लागे. दुसरा मार्ग म्हणजे टिळक रोडवरून स्वारगेट गाठायचे व सातारा रोडवरून सध्याच्या मित्र मंडळ रस्त्यावरून पर्वतीला जायचे. त्यावेळेस हा रस्ता कच्चा, खडबडीत व निर्मनुष्य असे त्यामुळे हा रस्ता त्याचबरोबर सातारा रस्त्यावरील साईबाबाचे मंदीर ही कॉलेजमधील आणि शाळांतील मुलामुलींची अत्यंत आवडती ठिकाणे होती. त्यावेळेस मैत्रिणीबरोबर समांतर सायकल चालवणे आणि कमी अंतर ठेवून सायकल चालवणे ही एक स्वतंत्र कलाच होती. अर्थात त्यावेळेस मैत्रीण असणे सुद्धा खूप दुर्लभ असे.

सायकलीवरून मैत्रिणीच्या घराभोवती फेऱ्या मारण्याचा आनंद आणि उत्कंठा वेगळीच असे. अनेक फेऱ्यांनंतर मैत्रिणीने दारात उभी राहून किंवा खिडकीतून पोचपावती दिल्यानंतरची धन्यता वेगळीच...

समुहाने सायकल चालवत असता काहीजण शेजारच्याला आपल्या सायकलच्या पुढच्या चाकाचा शिताफीने धक्का देऊन पाडण्यात निष्णात असत. तसे करण्यात त्यांना कसला क्रूर आनंद होत असे हे त्यांचं त्यांनाच माहीत... माझ्यावर असे बरेच प्रयोग झाले. कदाचित त्यात असूयासुद्धा असू शकेल. वयाच्या पंधरासोळाव्या वर्षी मित्रांबरोबर सायकलीवरून सिंहगडाच्या पायथ्यापर्यंत जाऊन, पायी गड चढून जाण्यात आणि परतीच्या वाटेने पुण्याला परत येण्यात जे साहसी समाधान वाटत असे ते वेगळेच.

पुण्यातील तीन वर्षांचे शालेय व कॉलेजचे शिक्षण संपल्यावर पुढील शिक्षणाकरता मुंबईला जाणे झाले व माझा सायकलीशी संबंध संपला. पुढे यांत्रिक दुचाकी व मोटार गाडी वगैरेने प्रवास चालू राहिला... परंतु पूर्वीचा सायकलवरील प्रवासाचा आनंद परत कधीच मिळाला नाही.



- **सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू**
- **सभासदांच्या कलागुणांना वाव**
- **चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता**
- **व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी**

**कलाकारी**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे**

## *Mumbai – A Maximum City*

*PE Rtn. Atul Atre*




Mumbai is the financial capital of India with people of all castes, creeds, religions & diversity staying here. The Father of the author Suketu Mehta was a diamond merchant in Calcutta who then shifted to Mumbai as the business importance of Mumbai increased after 1930. Subsequently, his father shifted to New York & Antwerp for the diamond business. Suketu Mehta spent his childhood in Mumbai & then shifted to New York. But he is so madly love in this city that he takes every opportunity to come here. So he decided to write a book on this city which is the pulse of India.

The shaping of Mumbai changed with Rent Control Act. With this, the tenants who were staying in buildings in Mumbai could not be evicted. The rents which landlords received were so small that even building maintenance was also not possible. The tenants became like owners. Tenants purchased flats in Mumbai suburbs but still continued to occupy their rented premises in Old Mumbai. As a result, there is a large number of properties that cannot be reconstructed. Hence a large portion of Old Mumbai remains unutilized. Also, Port Trusts holds huge lands which cannot be used for a common purpose. It created a scarcity of land in Old Mumbai. There is a big piece of land which is used by the Government especially at Nariman Point. During the

tenure of the Naik Government, it was decided to shift these offices to New Mumbai but top builders of Mumbai had vested interests. They used all their resources to ensure that this plan does not succeed. Hence the shortage of land in Mumbai continued. As Mumbai is covered by the sea, there are limitations to grow horizontally. All these factors made it congested.

The landscape of Mumbai changed after the 1992 riots. Babri Masjid was demolished in 1992. After that, a Police Station was burnt & 2 Hindus were stabbed. In Jogeshwari at Radhabai Chawl, a Hindu mazdoor family was sleeping. Their house was locked from outside & was torched. Police searched some Muslim houses & recovered large numbers of swords, sticks, etc. Then Shiv Sena decided to retaliate. What followed thereafter was a massacre. Muslims were targeted & killed. Police refused to file FIRs. The connection between Hindus & Muslims was lost forever. The government appointed Justice Shrikrishna Panel under pressure. Justice Shrikrishna did very extensive work & submitted his report indicting police officers & Shiv Sena leaders at fault. But that time Shiv Sena-BJP was the ruling party in Maharashtra. It rejected that report.

He has written various chapters describing many sides of Mumbai viz. Dance Bars & lives of the girls who work there. He has written extensively about gangsters & sharpshooters who are employed by Dawood or Shakeel Gangs by meeting them personally. He talked on the phone with Chota Shakeel in Dubai & has depicted his versions. He has written about the nexus between Cine Industry and the underworld. He has written a chapter describing lives in Mumbai Central Muslim dominated areas where Bakri Id is performed. He has written in-depth about how the animals viz. goats, bulls are slaughtered ceremoniously. He says slaughtering of cow is done very rarely & in a very clandestine way in order to avoid backlash with Hindus. He has written a chapter on the working of the Shiv Sena which is a dominant force of Mumbai. He has also written about Ajay Lal who was a Police Commissioner & his modus operandi. Vada Pav is an integral part of Mumbai. Right from workers, peasants, students & office goers, Vada Pav is the most favourite food of Mumbai.

There is a large population of Jains in Mumbai. Many Jain families are in Diamond Business. A super-rich Sevantibhai Dadhani along with his wife and three children decide to give up their super-wealthy diamond business to obtain Sanyas or become Teerthkars. This is a long process which they follow & subsequently from their native place that family starts its final journey. All the five family members are renamed & started walking their separate ways not to see each other again. Now they will walk barefoot, eat frugally & sleep in congested rooms for the rest of their life. They are now on the path of renunciation.

A chapter is written on demolition expert Mr Khairnar. One day Balasaheb Thackeray calls Mr Khairnar at his residence & tells him not to demolish a hotel. Mr Khairnar refuses & goes ahead with his plans. A few days later bullets are fired on him but he escapes and continues with his demolition drive.

This book depicts Mumbai as a 'Maximum City' because everything here is maximum. There are landlords, underworld gangsters, drug trafficking, riots, financial tussles, political wars, etc. It is a thick book over 500 pages but gives one a very good insight into this happening city.

## *Asha Bhosale – A Musical Biography*


***PP Rtn. Govind Patwardhan***

**Odyssey of the gifted singer.**

Last month Asha Bhosale has conferred the prestigious award 'Maharashtra Bhushan.' In fact, she is the pride of India. When the news was flashed on TV incidentally I was reading a book on her musical life authored by Raju Bharatan (sports and film journalist of repute). I thought it worth sharing.

In spite of family background, God gifted sweet voice and passion nothing came to her on a platter. It is an odyssey of a singer. Contrary to a perception she started her singing career almost at the same time as her illustrious elder sister Lataji. Her first song was in 1943 at the age of 10. At the age of 16, against the wishes of the family, she married Ganapatrao Bhosale who was twice her age. She

desired to be a good housewife and soon she was engrossed with and fully occupied by child care, household chores, family duties. By the time she was little free to take her musical career seriously the film music world has changed. Every music director's first choice was Lata. So Asha would get a chance to sing only if either Lata was not available or the director would not afford her fees. Asha found a mentor in O.P Nayyar. Not that OP has any quarrel with Lata but he himself once said that his kind of rhythmic compositions is suitable for Asha'a voice and not Lata's. Most of the songs which came her way were for supporting actress, cabaret songs or उडत्या चालीची गाणी. The home front was turbulent. Her husband used to look after her finances and she had little say in that. He exploited her. Ultimately she walked out with two kids at the age of 32.




Front line music directors rarely turned to Asha for songs for the main actress. When S.D. Burman had some issues with Lata he used Asha for some time. At that time his son R.D was his assistant. Asha and R.D. bonded well and came close to each other. By that time she had divorced and was staying with OP Nayyar for over 10 years. her relations with OP gradually strained. So much so, that in her later life she never acknowledged OP's contribution to her music career. Their last song reflects the bitterness. It was for film प्राण जाये पर वचन न जाये. The wording was 'चैनसे हमको कभी, आपने जीने ना दिया, जहर भी चाहा अगर पीना तो पीने न दिया.' Asha received Filmfare award for best playback singer. But she was so depressed that she refused to attend. OP attended and received on her behalf. But she was so much hurt that she did not accept it from OP. What a sad ending to a story.

Before that "Tisari Manzil" was released. R.D Burman's prowess was acknowledged by everyone and he came out of the shadow of his father. Song Aja, Aja became a rage and is so even today. Asha became a front-line singer and also

found her soulmate in R.D. by that time Music technology has changed and R.D. was the master of it. Both excelled in each other's company. Dam maro dam, Parde mein rahane do.. were prime numbers. Asha took over Lata in terms of a number of songs for Hindi films. Around 1990, Asha was challenged by Anuradha Paudwal who was hurt by the treatment given to her by the Mangeshkar family. The challenge was furious but short-lived. Asha's life took one more turn. R.D. Burman met with an untimely death in 1994. Her daughter committed suicide. Son died of cancer in 2015. Isn't God cruel to her? After reading about the ordeals Asha overcame in her life, my appreciation grew multi-fold. Various awards and acclaims came her way very late in her life. But she has carved her name in the hearts of millions of fans. Her evergreen enthralling songs which reflect her personality will be remembered for years to come.

The author is a hardcore Lata fan is evident in the narrative meant for Asha. But his account of the musical journey of very adorable singer Asha is honest and gives an inside account of what happens in the film industry, various trends in film music for over 60 years.

My favourite songs of Asha

- *दिल चीज क्या है आप मेरी जान लीजिए*
- *पूछो न हमें हम उनके लिए*
- *चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले*
- *खेड्यामधले घर कौलारू*
- *उषःकाल होता होता*


- सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...
- हलकंफुलकं लेखन हवं
- पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज
- राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी

दृष्टिकोन

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## Donations for Sadbhavana Medical camp: BWF

1. Rtn Vilas Apte - Rs.10,000
2. Ann Madhavi and Rtn Abhijit Deshpande - Rs.10,000
3. FL Ann Sugandha Natu - Rs.10,000
4. Ann Swati Velankar - Rs. 10,000
5. Ann Anjali and Rtn Datta Deodhar - Rs. 11,000
6. Ann Chitra and Rtn Ramesh Prabhumirashi- Rs. 10,001
7. Shri Kishor Madhukar Shelgikar- Rs. 20,000
8. Dr. Mrs. Vaijayanti Dheodhar- 5,000
9. Rtn Atul Atre- Rs. 10,000
10. Rtn Virendra Shah- Rs. 25,000
11. Ann Dr. Vijaya Gujrathi- Rs.25,000
12. Dr. Satish Gosavi- Rs. 25,000
13. Shree Pradeep Desai- Rs. 25,000
14. PP Rtn Sudhanshu Gore announced a donation of Rs. 10,000 to BWF in remembrance of Late Leena Gore (19th April) for the education of a girl child Ms. Rabiya till her 10th Std.
15. Dr. Anushree Gosavi announced a donation of Rs. 10,000 to BWF in remembrance of her father Late Shri Sharad Dixit for the education of a girl child every year on 21st April.
16. First Lady Ann Sugandha announced an additional donation of Rs. 10,000/ to BWF for the education of a girl child.

## Donation for HIV affected families:

- Adopted 15 HIV-affected families have distributed Groceries at St. Mary's Church on 28th March 2021 (Palm Sunday). They were also given a snack of "Idli-Chatni" which was sponsored by Rtn Mrudula Ghodake

## विशेष

- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर

## टीम बुलेटिन

## सदरं

- मुखपृष्ठ ........................श्वेता............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी.........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी.......................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन.......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती
- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी